ॐ

# ज्ञान प्रबोधिनी

## सौर आषाढ १९३९ चे

## मासिक वृत्त

**सौर श्रावण १, शके १९३९ दि. २३/७/२०१७**

### मा. संचालकांचे प्रश्नोत्तर-रूप चिंतन

**प्रश्न** : प्रबोधिनीत कोणत्या गुरूंचे गुरुपूजन करावे? कशा प्रकारे करावे?

**उत्तर** : प्रबोधिनीचे काम शैक्षणिक आणि संघटनात्मक असे दोन्ही स्वरूपाचे आहे. या पैकी कोणतेही काम करणाऱ्यांना आपण प्रबोधिनीची भूमिका म्हणून गुरुपूजन करणे अनिवार्य म्हटलेले नाही. शाळेत शिकणाऱ्यांना गुरुपूजनाची भारतीय परंपरा समजावी यासाठी त्यांनी व्यक्तिशः त्यांच्या विषय- शिक्षकांना, वर्गशिक्षकांना, मुख्याध्यापकांना गुरुपूजनाच्या वेळी फुले द्यावीत, व्यक्तिशः नमस्कार करावा, व्यक्तिशः वंदन करावे, असे आपण सुचवतो. दलांवर येणाऱ्या अन्य शाळांमधील विद्यार्थ्यांनी आपापल्या शाळेतील शिक्षकांना व्यक्तिशः भेटून त्यांना फुले द्यावीत व नमस्कार करावा असेही सुचवतो. शालेय वयातच असे गुरु-शिष्यांचे भावपूर्ण नाते तयार झाले तर शिष्य आपल्या प्रौढ वयातही व्यक्तिशः गुरुपूजन चालू ठेवतात असे दिसते. प्रबोधिनीच्या शाळांमध्ये वर्गशः गुरुपूजनाचे कार्यक्रमही अवश्य व्हावेत. कृतज्ञता व्यक्त करण्याची भारतीय परंपरेची पद्धत विद्यार्थ्यांच्या अंगवळणी पडावी म्हणून शैक्षणिक विभागांनी गुरुपूजनाला प्रोत्साहन देण्याची भूमिका ठेवावी.

व्यक्तिशः गुरुपूजनाच्या वेळी अर्थार्जन न करणाऱ्या विद्यार्थ्यांनी गुरुदक्षिणा म्हणून विकतचे गुच्छ, भेटपत्रे किंवा भेटवस्तू न देता या सर्व गोष्टी स्वतः तयार करून देणे हे गुरुपूजनाचा भाव अधिक योग्य रितीने व्यक्त करते असे सांगायची गरज मात्र निश्चित निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना गुरुपौर्णिमेच्या किंवा शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देणे हे देखील गुरुपूजनाचे मर्म न समजल्याचे लक्षण आहे.

संघटनात्मक काम करणाऱ्यांनी गुरुपूजन कसे करावे? काही वेळा दलांवरती गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने समाजातील ज्येष्ठ व्यक्तींना मुद्दाम भेटून त्यांचा फुले देऊन सत्कार करावा असे आपण प्रबोधकांना सुचवतो. दलाचा गुरुपूजनाचा कार्यक्रम योजला तर गुरू म्हणून कोणाचे पूजन करावे? आपल्या संघटनेमध्ये गुरुस्थानी कोण? अशी चर्चा एका दलाच्या गुरुपूजनाच्या कार्यक्रमानंतर झाल्याचे आठवते. संचालक, कार्यवाह, युवक सचिव, युवती सचिव, प्रतोद, मार्गदर्शक यांच्यापैकी कोणाचे किंवा प्रबोधिनीतील कोणत्याही ज्येष्ठ व्यक्तीचे गुरू म्हणून पूजन किंवा सत्कार दलांवर मुद्दाम योजू नये अशी चर्चा तेव्हा स्पष्टपणे झाल्याचे आठवते. मातृभूमी किंवा ॐ ला गुरू मानायला हरकत नाही अशी ही चर्चा तेव्हा झाली होती. परंतु, 'हिंदू संस्कृती हीच आपली गुरू. ही संस्कृती निर्माण करणाऱ्यांची परंपरा आपली गुरू. या संस्कृती-परंपरेचे एकत्रित प्रतिनिधी म्हणून चारही पथकाधिपतींचे पूजन संघटन प्रभागात व्हावे', असा त्या चर्चेचा अंतिम आशय होता.

विभागाच्या स्तरावर गुरुपूजन योजायचे झाले, तर संघटनात्मक काम करणाऱ्यांसाठी, आजपर्यंत तरी, आपण ते 'वैकल्पिक'च ठेवले आहे. वर्षारंभ, वर्षान्त उपासनांप्रमाणे 'आवश्यक' म्हटलेले नाही.

गिरीश श्री. बापट
संचालक

### ❊ सन्मान ❊

सौर १६ आषाढ (दि. ७ जुलै) 'निनाद पुणे गुरूतत्त्व पुरस्कार ' आदर्श शिक्षक सन्मान, श्री. सूर्यकांत पाठक यांच्या हस्ते मा. यशवंतरावांना देण्यात आला. त्यावेळी त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. '' ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वा. गिरीश बापट व पुण्याचे पालकमंत्री मा. गिरीश बापट व मा. प्रकाश जावडेकर हे माझे विद्यार्थी. असे शिष्य मोठे झालेले पाहणे यात जी धन्यता आहे ती शाल-श्रीफळामध्ये नाही. हे विद्यार्थी हेच आपल्या अभिमानाचे स्थान, हे माझे विद्यार्थी हे अभिमानाने सांगता येणे हेच खरे भाग्य. ''

### छात्र प्रबोधन

सौर १७ आषाढ (दि. ८ जुलै) रोजी कुमार साहित्य संपादकांचा मेळावा झाला. यावेळी प्रकाशक, नियत कालिकांचे संपादक, वृत्तपत्रातून कुमार वयोगटासाठी पुरवणी प्रकाशित करणारे संपादक असे एकूण २८ जण सहभागी झाले होते. नऊ मासिके, तीन वृत्तपत्रे, पाच प्रकाशक संस्थांचे संपादक व त्यांचे सहकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाची दोन सत्रांमध्ये विभागणी केली होती. पहिल्या सत्राच्या अध्यक्षा श्रीमती ज्ञानदाताई नाईक होत्या. या सत्रामध्ये बाल/कुमार साहित्य प्रकाशित करतांना आलेले अनुभव व अडचणी आणि त्यावर केलेली मात या मुद्द्यांचा समावेश होता. काही सुखद अनुभवही सदस्यांना सांगितले.

दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष मा. विवेकराव पोंक्षे होते. या सत्रामध्ये बाल/कुमार साहित्य चळवळी समोरची भविष्यातील आव्हाने व उपाय योजना या विषयावर चर्चा झाली. मासिकाची सजावट व मांडणी या बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शासनाकडून आर्थिक अनुदान मिळविणे, मासिकाच्या आशयामध्ये कालानुरूप बदल करणे, सर्व बाबतीत एकमेकांना मदत करणे हे मुद्दे चर्चेला आले.



पान क्र. ५ व ६ वर काही उपक्रमांची प्रकाशचित्रे

## नेतृत्व संवर्धन केंद्र

सौर २४ आषाढ (दि. १५ जुलै) रोजी विभागाची वर्षारंभ उपासना व मार्चमध्ये संपलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभ झाला. विविध निकषांच्या आधारे केलेल्या मूल्यमापनानुसार जिज्ञासा ९ मधील १०, विश्वास ७ मधील ८, आकांक्षा ३ मधील ८ व जाणीव (सामाजिक) मधील ५, अशी एकूण ३१ विद्यार्थ्यांना बक्षीसे मिळाली. प्रशस्तिपत्रक, रोख रक्कम व पुस्तक असे बक्षीसांचे स्वरूप होते. या कार्यक्रमाला मा. गणेश शिंदे (डी. सी. पी., पुणे) व मा. विद्युत वरखेडकर (Deput CEO, PMRD) हे दोघे उपस्थित होते. एक अधिकारी म्हणून कोणकोणत्या जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात तसेच धैर्याने तोंड देऊन गोष्टी कशा बदलता येतात असे सांगत विविध अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडले. मा. महेंद्रभाईंनी कार्यक्रमाचा समारोप केला.

## संत्रिका

सौर २१ आषाढ (दि. १२ जुलै) रोजी 'PUNE ३६५' या वार्तापत्रात ज्ञान प्रबोधिनीची संस्कार विषयक भूमिका आणि संस्कार पोथ्या तयार करताना त्यासाठी केला जाणारा अभ्यास या विषयी वाच. आर्या जोशी यांची मुलाखत प्रसिद्ध झाली.

## युवक विभाग, पुणे

**मार्गदर्शक अभ्यास शिबिर :** सौर ८ ते ११ आषाढ (दि. २९ जून ते २ जुलै) या कालावधीत २१ शालेय व सहा महाविद्यालयीन मार्गदर्शकांचे निवासी इतिहास अभ्यास शिबिर झाले. कै. आप्पांच्या वैचारिकांमधील इतिहासविषयक वेच्यांचे अप्रकाशित संकलन अभ्यासासाठी वापरले होते. इतिहास का अभ्यासायचा, कसा अभ्यासायचा याबद्दल गटश: हे संकलन वाचून चर्चा होत होती. या चर्चेला टोक आणण्यासाठी मा. संचालकांची या विषयावर दोन दिशादर्शक व्याख्यानेही झाली. याशिवाय डेक्कन कॉलेज, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर या दोन ठिकाणी क्षेत्रभेटी झाल्या. व्याख्यानांपैकी पेशवाईचा इतिहास सांगण्यासाठी तरुण अभ्यासक शिवराम कार्लेकर, पाश्चात्य राजवटींचा भारताच्या आधुनिक काळातील प्रगतीशी असणारा संबंध उलगडून दाखविण्यासाठी माजी खासदार प्रदीपदादा रावत, इ. स. ५०० ते १००० या काळातील भारताचा संकलित इतिहास सांगण्यासाठी डॉ. श्रीनंद बापट, शिखांचा इतिहास सांगण्यासाठी कँपमधील गुरुद्वारातील ग्यानी अमरजितसिंहजी, मराठ्यांचा इतिहास सांगण्यासाठी इतिहास संशोधक पांडुरंगजी बलकवडे असे वक्ते बोलवले होते. शिबिराचा समारोप पुणे शहरभर चाललेल्या चिठ्ठ्यांच्या खेळाने झाला. प्रा. प्रशांत दिवेकरांनी हा खेळ आयोजित केला होता. एकेक चिठ्ठी व्हॉट्स ॲप गटांवरून पाठवली जायची, ती पाहून पुण्यातील ते ऐतिहासिक ठिकाण ओळखणे, गुगल नकाशांच्या साहाय्याने ते हुडकणे, तेथे जाणे व गटाचा त्या त्या ठिकाणाबरोबर सेल्फी काढणे आणि त्या ठिकाणाबद्दल थोडक्यात माहिती देणे असे या खेळाचे स्वरूप होते.

**गिरीभ्रमण मोहिमा :** 'दुर्गम' नावाचा युवकांचा गट दलांवर न येणाऱ्या युवकांना गोळा करून महिन्याला एक मोहिम काढतो आहे. कोकणात उतरणाऱ्या सर्व घाटवाटांनी ट्रेकिंग करून उतरणे असे त्यांचे उद्दिष्ट आहे. तसे यावेळी भीमाशंकर ते कोथळीगड या वाटेने हा गट उतरला. या मोहिमांची जीपीएस प्रणालीमध्ये नोंदणीही होत आहे; जेणेकरून अन्य गिरीप्रेमींना याचा उपयोग होईल.

**ओडिशा अभ्यास दौरा :** नेताजी सुभाषचंद्र बोस दलावरील १९ युवकांचा ओडिशा राज्याचा अभ्यास दौरा सौर ३० ज्येष्ठ ते ९ आषाढ (दि. २० ते ३० जून) या कालावधीत झाला. मयूरभंज, कंधमाल या जिल्ह्यांमधील बारीपाडा व तपांगी अशा आदिवासी गावांमध्ये राहून तेथील जीवन अनुभवणे, तेथील प्रशासकीय कामांचा अनुभव घेणे, भुवनेश्वर, पुरी, कोणार्क धौली, उदयगिरी व खंडगिरी अशा ठिकाणी जाऊन तेथील मंदिरे, पर्वत व अन्य प्रेक्षणीय स्थळांचा सांस्कृतिक समृद्धीचा अभ्यास करणे असा या दौऱ्याचा कार्यक्रम होता.

## नागरी वस्ती अभ्यासगट

नागरी वस्ती विभागातर्फे जून महिन्यामध्ये पुणे स्टेशन परिसरात चार वस्त्यांमध्ये दल झाले. पाटील इस्टेट, महात्मा गांधी वसाहत, शिवाजी नगर रेल्वे स्टेशन, विष्णुकृपा नगर या चारही दलावर अभ्यास वर्ग, मैदानी व इतर खेळ, सणांची माहिती दिली व गुरुपौर्णिमा साजरी केली. वर्तमानपत्रे वाचून दाखवणे, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवणे, गप्पा-गोष्टी गाणी, प्रार्थना असे निरनिराळे उपक्रम झाले. एकूण ४९ किशोर/किशोरी या महिन्याच्या दलात सहभागी झाले.

**युवती मेळावा :** सौर ४ आषाढ (दि. २५ जून) रोजी ज्ञान प्रबोधिनी वास्तूमध्ये विविध वस्त्यांमधील युवतींचा पूर्ण दिवसाचा मेळावा झाला. एकूण ४१ युवती आणि पाच कार्यकर्त्या अशा ४६ जणी मेळाव्यात सहभागी झाल्या. ज्ञान प्रबोधिनीमध्ये शिकवणाऱ्या श्री. आल्हाद कुलकर्णी यांनी १०वी व १२वी नंतर पुढील शिक्षणाबद्दल मार्गदर्शन केले.

एका सत्रात 'तरुणाईची आव्हाने' या विषयावर तीन निवडक विषय संवादिनीच्या सुलभा मराठे व अंजली भिडे यांनी नाटकाच्या माध्यमातून मांडले. विषय होते सुंदरता, सुंदर दिसण्यापेक्षा सुंदर असणे किती महत्त्वाचे आहे हे सांगितले. आलेल्या युवतींनी मुलगा/मुलगीमध्ये भेदभाव कसा करतात या विषयावर नाटक सादर केले.

**महिला मेळावा जून २०१७ :** सौर ४ आषाढ (दि.२५ जून) रोजी सावित्री दलाची सातवी बैठक झाली. बैठकीची सुरुवात सर्वधर्म प्रार्थनेने झाली. या बैठकीपासून बचत गटाची सुरुवात केली. बचत गटात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिलांची यादी बनवली. 'प्रबोधिका' असे बचत गटाचे नाव ठरले. या बचत गटाचे उद्दिष्ट काय असणार आहे ते हर्षाताईनी सांगितले. प्रबोधिनीमध्ये येऊन महिला जे शिकतील उदा. वाचन, लेखन, प्रबोधिनीचे पद्य, अभंग, एखादे कौशल्य त्या आपल्या वस्तीमध्ये जाऊन इतर महिलांना शिकवायचे हे उद्दिष्ट आहे. इथे ज्या महिला येतात, त्या वस्तीमध्ये प्रबोधिनीच्या संपर्क व्यक्ती म्हणून काम करतील. या बैठकीमध्ये संत्रिकेच्या सुरेखाताई लिखिते यांनी प्रबोधिनीच्या संत्रिका विभागाबद्दल माहिती दिली. विभागातर्फे होणाऱ्या संस्कारांबद्दल माहिती दिली. हरितालिका पूजनाची पोथी वाचून दाखवली.

## ज्ञान प्रबोधिनी, हराळी

**कृषी विस्तार –** आजूबाजूच्या गावांमधील शेतकऱ्यांना हवामान अंदाज व शेतीविषयक माहिती पोहोचवण्यासाठी दर सोमवारी SMS सेवा सुरू केली आहे. पुढील वर्षात २०० शेतकऱ्यांपर्यंत नियमितपणे ही सेवा दिली जाणार आहे.

**पूरक शिक्षण विभाग –** या वर्षी पूरक शिक्षण विभागांतर्गत किशोरी विकास, प्रज्ञा विकास, बाल विकास, छोटे सायंटिस्ट मिळून आजूबाजूच्या २० गावांमधील शाळांमध्ये उपक्रम सुरू झाले आहेत. या उपक्रमांची पहिली परिचयसत्रे जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात आली.

**किशोरी विकास –** कृषी विद्यालयातून नुकत्याच उत्तीर्ण होऊन पदविका पूर्ण केलेल्या दोन विद्यार्थिनी या वर्षी किशोरी विकास उपक्रमामध्येर्णाहाय्यक म्हणून रुजू झाल्या आहेत.

**प्रज्ञा विकास –** या वर्षी नव्यानेच सुरू केलेला प्रज्ञा विकास उपक्रमाची पहिली परिचय सत्रे सहा शाळांमध्ये झाली. तसेच भोसगा व बलसूर येथील आश्रम शाळांमध्ये अनौपचारिक सत्रे घेण्यात आली. सहा शाळांमधून ७वीच्या वर्गातील ६४ विशेष गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली व त्यांच्या पालकांच्या भेटी घेण्यात आल्या. निवड झालेल्या विद्यार्थांच्या करिता दर शनिवारी हराळी केंद्रावर शिबिरे सुरू झाली आहेत.

**छोटे सायंटिस्ट –** गेल्या वर्षी फक्त ८वीच्या वर्षासाठी सुरू असलेला छोटे सायंटिस्ट उपक्रम या वर्षी आठ शाळांमध्ये ८वी आणि ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी सुरू झाला आहे.

**बाल विकास –** या वर्षी चार गावांमधील शाळांमध्ये निरंतर बाल विकास उपक्रम सुरू झाला आहे.

## विस्तार केंद्र, बोरीवली

**उमलू सर्वांगाने** : सौर १० आषाढ (दि. १ जुलै) नेहमीप्रमाणे ओंकार श्लोक पाढे झाले नंतर शरीर संपदा यावर विद्याव्रत पुस्तकाच्या आधारे गटचर्चा घेण्यात आली. विद्यार्थ्यांचा सहभाग चांगला होता. नंतर एका सत्रात विद्याव्रत पुस्तकाच्या आधारे ' मना करा रे प्रसन्न 'हा विषय घेऊन त्यावर चर्चात्मक विवेचन झाले. छोट्या-छोट्या प्रश्नांतून विषय समजविण्याचा प्रयत्न केला. पुढल्या दिवशी 'गिरणी' हा सिनेमा दाखवला. मुलांना तो कळला. त्या नंतर त्याबद्दलच्या चर्चेत सर्वानी उत्साहाने भाग घेतला. त्यामुळे चर्चा खूप रंगली.

सौर २६ ज्येष्ठ (दि. १६ जून) शिवसेवा येथे नवीन वर्षातील पहिला कार्यक्रम. त्यानंतर गेल्यावर्षीच्या वर्धापनदिनाचा अहवाल स्मिता फडणीस यानी वाचून दाखविला. यावर्षी दरमहिन्याला निरनिराळ्या राज्यांची ओळख करुन देणारे सदर सुरू झाले. त्या अंतर्गत महाराष्ट्र राज्याची ओळख शुभदा केळकर यांनी वाचून दाखवली. आणखी एक सदर 'बोधविचार' यामध्ये स्मिता फडणीस यांनी 'व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्याव्रत' ह्या पुस्तकातील उतारा वाचून त्यावर सर्वानी चर्चा केली. उपस्थिती २० होती.

## प्रज्ञा मानस संशोधिका

सौर ५ ते १० आषाढ (दि.२६ जून ते १ जुलै) दरम्यान प्र.मा.सं ने 'संशोधन पध्दती व संख्याशास्त्र (Intensive Workshop on Research Methodology Statistics : Application in Social Sciences)' या विषयावर सहा दिवसांची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेसाठी ICSSR (WRC) चे अनुदान मिळाले होते. चेन्नई, अहमदाबाद, जयपूर, मुबई, रत्नांगिरी, पुणे अशा ठिकाणाहून ४० विविध विषयातील विद्यार्थी संशोधक (Psychology, Social Work, Gender Studies, Health Science, Management etc.) सहभागी झाले होते. कार्यशाळेत १३ तज्ञांनी मार्गदर्शन केले. विविध विद्यापीठांच्या आजी व माजी विभाग प्रमुखांबरोबरच (मुंबई, पुणे एस.एन.डी.टी. कर्वे संस्था) Dr. Robert Roser (Fulbright Scholar from Penn State University) यांचेही मार्गदर्शन मिळाले. ज्ञा.प्र.सं.संस्थेचे सल्लागार प्रा. डॉ. सी.जी. देशपांडे यांनी सहभागी सदस्यांना प्रशस्तीपत्रके दिली व मार्गदर्शन केले. प्रणिता जगताप कार्यशाळा समन्वयक व कांचन पांडे यांच्या मदतीने कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली.

## ग्राम विकसन

**नैसर्गिक संसाधने विकास –** माजी विद्यार्थी भेट : ज्ञान प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थांच्या गटाने वरोती खुर्द येथील विहीर बांधकामात

सुरुवातीपासून मोठे योगदान दिले आहे. प्रशालेतील १९७६च्या तुकडीमधील १४ जणांनी आत्तापर्यंत एकूण रु. ३ लक्ष ची मदत या कामासाठी दिली आहे. सुनिल जगताप, प्रमोदराव सडोलीकर व अजितराव कानिटकर यांनी हे निधी संकलन करण्यात पुढाकार घेतला. यापैकी पाच जणांनी नुकतीच वरोती खुर्दला प्रत्यक्ष जावून विहिरीच्या कामाला भेट दिली. यावेळी मा. कार्यवाह तसेच मध्यप्रदेश मधील स्वामी देवसेवानंद हेही उपस्थित होते.

**प्रकट मुलाखत :** रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे आयोजित पाणी कवीसंमेलनात विभागातील सुनीताताई गायकवाड यांची पाणी प्रश्नाबाबत मुलाखत घेण्यात आली. पुण्यातील साहित्य परिषदेत झालेल्या या कार्यक्रमात आयोजक प्रमोद आडकर व प्रज्ञा महाजन यांनी सुनीताताईंची प्रकट मुलाखत घेतली. त्यानंतर विविध कवींनी आपल्या पाण्याबाबतच्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोहनराव गुजराथी होते. यावेळी उपस्थित राहिलेल्या वेल्ह्यातील कार्यकर्त्यांना आयोजकांनी व्यासपीठावर बोलावून त्यांची दखल घेतली.

## शैक्षणिक उपक्रम संशोधिका

सौर ५ व ६ आषाढ (दि. २६ व २७ जून) या कालावधीत रामकृष्ण मिशन, ग्वाल्हेर, मध्यप्रदेश येथे अध्यापन कौशल्ये या विषयी आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गात उपस्थित ७५ शिक्षकांना प्रा. सुरेंद्र ठाकूरदेसाई , प्रा. प्रशांत दिवेकर यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन केंद्रिय मंत्री मा. नरेंद्रसिंग तोमर (खाते - ग्राम विकास व पंचायत राज्य, स्वच्छ भारत ) यांच्या उपस्थित झाले. याप्रसंगी महाराज सुप्रदिप्तानंद उपस्थित होते.

सौर ८ व ९ आषाढ (दि. २९ व ३० जून) रोटरी क्लब सारसबाग यांनी YMC सभागृह क्वॉर्टर गेट, पुणे येथे विज्ञान विषयी आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गात प्रा.विवेक पोंक्षे, प्रा. प्रशांत दिवेकर, प्रा. ओंकार बाणाईत, प्रा.प्रकाश रणनवरे व पूर्वा दीक्षित यांनी मार्गदर्शन केले.

सौर २३ ते २७ आषाढ (दि. १४ ते १८ जुलै) या कालावधीत विवेकानंद केंद्र विद्यालय शिक्षा प्रसार विभाग आसाम येथील दहा शिक्षकांचे प्रशिक्षण प्रकल्प पद्धतीवर नचिकेत नित्सुरे व कल्पेश कोठाळे यांनी ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी येथे घेतले.

सौर आषाढ २४ व २५(दि. १५ व १६ जुलै) या कालावधीत पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ व ज्ञान प्रबोधिनी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान व गणित शिक्षकांचा प्रशिक्षण वर्ग ज्ञान प्रबोधिनीत झाला. एकूण ८० शिक्षकांचा सहभाग होता.

**शैक्षणिक साधन केंद्र**

ज्ञान प्रबोधिनी आणि TCSiON यांच्या संयुक्त विद्यमाने https://teacher.tcsionhub.in या पोर्टलवर महाराष्ट्रातील शिक्षकांसाठी रूप पालटू शिक्षणाचे या नावाने एक परिवार तयार करण्यात आला. हा परिवार शिक्षणातील नाविन्यपूर्ण कल्पनांची, उत्कृष्ठ पद्धतींची (Best practices) आणि अभिनव प्रयोगांची देवाणघेवाण करण्याचे व्यासपीठ आहे. येथे शिक्षकांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील. त्यांनी मांडलेल्या शैक्षणिक उपक्रमांना दाद मिळेल आणि जगभर चाललेल्या शैक्षणिक कार्यक्रमात सहभागी होता येईल.

## ज्ञान प्रबोधिनी, निगडी

सौर ५ आषाढ (दि. २६ जून) रोजी विभागातील शिक्षिका प्रणालीताई महाशब्दे यांनी जळगाव येथील आशा इंडिया फौन्डेशन यांच्या shrap या संस्थेत अभ्यासात मागे असणाऱ्या मुलांसाठी काम करणाऱ्या शिक्षकांची कृतीयुक्त कार्यशाळा घेण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी गेल्या होत्या. त्यांना साहाय्य म्हणून कविताताई करगोटे या ही गेल्या होत्या. परिसरातील दृष्टी या प्रेरणादायी संस्थेला ही त्यांनी भेट दिली.

**शिष्यवृत्ती परीक्षा निकाल –** माध्यमिक मराठीतील इ. ५वीच्या व इ. ८वीच्या विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे यश मिळवले.

**इ.५ वी ३०० पैकी गुण**

| | |
|---|---|
| १. मल्हार ओझर्डे २५८ | ५. ध्रुव उंडे २३६ |
| २. हर्षवर्धन २५४ | ६. वरुण बेळून्खे २२४ |
| ३. सिद्धेश कोतकर २५० | ७. समीक्षा शेटे २२० |
| ४. यश मुळे २३८ | ८. ध्रुव शिंदे २१८ |

**इ. ८ वी ३०० पैकी गुण** - १ ओमकार दुधानी २०४

**युवती विभाग :**

**शालेय दल –** सौर १६ आषाढ (दि.७ जुलै) पासून शालेय दलाला सुरुवात झाली. मराठी माध्यमातील मुलींचा पहिले दल शुक्रवारी झाले पण मग नंतर मुलींशी बोलून ते सोमवारी घ्यायचे ठरले आहे. इंग्रजी माध्यमाचे दल शनिवारी होत आहे. आत्तापर्यंत दोन्हींची दोन-दोन दले झाली आहेत. पहिले दल क्रीडा दल झाले आहे. आणि दुसऱ्या दलामध्ये जाहिरात बनविण्याचे कृतिसत्र घेतले आहे.

दोन्ही दलांना मराठी माध्यमाची २२ आणि २० आणि इंग्रजी माध्यमाची १४ अशी उपस्थिती होती. ही दले घेण्यासाठी ११वीच्या सात-आठ मुली खूप उत्साहाने आणि मोठ्या संख्येने येत आहेत.

### स्त्री शक्ती प्रबोधन

## संवादिनी

**उमलत्या वयाशी......कार्यशाळा** १) सौर २९ व ३० ज्येष्ठ (दि. १९ व २० जून) या दोन दिवशी विजयमाला कन्याशाळा येथे इ. ९वीच्या विद्यार्थीनींसाठी कार्यशाळा घेतली. ४० मुली याला उपस्थित होत्या. २) याच शाळेमध्ये इ. ५वी ते ७वीच्या ६०० मुलींसाठी सौर २१ आषाढ रोजी 'ओळख स्पर्शाची' ही एक दिवसीय कार्यशाळा घेतली. ३) सौर १० आषाढ (दि. १ जुलै) रोजी 'ओळख स्पर्शाची' चे प्रशिक्षक प्रशिक्षण ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथे घेण्यात आले. एकूण १९ जणांनी यामध्ये सहभाग घेतला. ४) सौर २४ आषाढ (दि. १५ जुलै) रोजी सोलापूर येथे ३री, ४थी व ६वीच्या २३० मुलांसाठी 'ओळख स्पर्शाची' कार्यशाळा झाली. ३री व ४थीच्या पालक बैठकीत या विषयी माहिती दिली. याला २५० पालक उपस्थित होते तसेच तेरा सोलापूर संवादिनी सदस्यांनी 'ओळख स्पर्शाची' चे प्रशिक्षक प्रशिक्षण घेतले.

**विद्याव्रत संस्कार** १) सौर ३० ज्येष्ठ ते ६ आषाढ या कालावधीत आर.सी.एम. गुजराथी स्कूल (इंग्रजी माध्यम) येथे विद्याव्रत व्याख्याने झाली व सौर ७ आषाढ रोजी संस्कार झाला. एकूण १२१ विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला. २) आर.सी.एम. गुजराथी स्कूल (गुजराथी माध्यम) येथे सौर १२ ते १९ आषाढ या कालावधीत व्याख्याने झाली अंदाजे १०० विद्यार्थी उपस्थित होते. सौर २० आषाढ या दिवशी संस्कार झाला. शाळेच्या प्राचार्या व पर्यवेक्षिका आचार्या होत्या.

### ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

**छोटे सायंटिस्ट आढावा बैठक –** छोटे सायंटिस्ट या प्रकल्पाला या वर्षी पाच वर्षे पूर्ण झाली. मागील पाच वर्षांचे सिंहावलोकन व पुढील प्रकल्पाचे नियोजन करण्यासाठी २० शाळांचे विज्ञान अध्यापक व प्रतिनिधी यांची सौर २ आषाढ (दि. २३ जून) रोजी बैठक घेतली. या बैठकीमध्ये पुढील गोष्टी ठरवल्या –

- प्रत्येक २० शाळांनी आपल्या शेजारील एक माध्यमिक शाळा दत्तक घेऊन तेथे हा प्रकल्प पोहोचविणे.
- वर्षभरात ज्या ठिकाणी विज्ञान संदर्भात उत्तम काम चालते अशा ठिकाणांना प्रकल्प भेट देणे व त्यातून नवीन संकल्पना तयार करणे.
- तसेच छोटे सायंटिस्टचे काम वाढविणे व उत्तमता आणणे यासाठी चर्चा करण्यात आली. श्री. गणेश भताने यांनी याचे नेतृत्व केले.

**व्यवसाय प्रशिक्षण केंद्र –** श्री. गणेश भताने व शुभंकर केळकर यांनी पाच शाळांना भेट देऊन व्यवसाय प्रशिक्षण केंद्राचा प्रचार केला.

### स्पर्धा परीक्षा केंद्र -

**संचालक भेट, वर्षारंभ उपासना व पालक मेळावा :** सौर १० आषाढ, (दि. १ जुलै) रोजी संचालक भेट, वर्षारंभ उपासना व पालक मेळावा यांचे आयोजन करण्यात आले होते. २०१७-१८ या वर्षामध्ये UPSC चे Comprehensive Batch ह्या वर्षभराच्या तुकडीचे एकूण विद्यार्थी ७५, Facilitation Batch ह्या शनिवारच्या तुकडीचे एकूण विद्यार्थी २७ व Mission Mains ह्या पूर्व परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांच्या तुकडीचे एकूण विद्यार्थी ७५ अशा सर्व नवीन विद्यार्थ्यांसाठी वर्षारंभ उपासनेची योजना केली होती. याचवेळी केंद्रामध्ये विविध कामांना ज्ञान प्रबोधिनीचे मा. संचालक डॉ. गिरीश बापट यांची भेट आयोजित करण्यात आली होती. तसेच या प्रसंगी सर्व नवीन विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावाही आयोजित करण्यात आला होता.

**विशेष व्याख्यान :** MPSC मुख्य परीक्षा २०१७ देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'तंत्र आणि मंत्र' अशा विषयावर श्री. अमोल मांडवे (Dy.SP.) यांचे सौर १६ आषाढ (दि. ७ जुलै) रोजी व्याख्यान झाले.

### युवती विभाग, पुणे-

सौर १० आषाढ (दि. १ जुलै) रोजी झालेल्या पुणे केंद्राच्या वर्षारंभाच्या निमित्ताने विभागातील काही प्रमुख नव्या नियुक्त्या जाहीर केल्या. १) युवती संघटन सचिव – कु. प्रज्ञा प्रभुदेसाई २) महाविद्यालयीन दले साहाय्यक विभागप्रमुख – कु. अबोली पुरंदरे ३) शालेय दले साहाय्यक विभागप्रमुख – कु. श्रुती वैद्य

पुणे केंद्रात आषाढी एकादशीनिमित्त सौर २३ आषाढ (दि. १४ जुलै) रोजी भजन झाले. याची समन्वयाची जबाबदारी युवती विभागाकडे होती. एकूण आठ विभागातील ४६ सदस्यांचा भजन सांगण्यात सहभाग होता.

### ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

**बक्षीसे कौतुक – लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धा –** टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे सौर १८ आषाढ (दि. ९ जुलै) रोजी

आयोजित 'लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धे'त प्रशालेस सर्वसाधारण विजेतेपद मिळाले. प्रथम गटात (५वी-६वी) कुणाल कुरंदळे - ५वी यास तृतीय पारितोषिक व द्वितीय गटात ( ७वी-८वी) - उदिता काळे इ. ८वी हीस प्रथम पारितोषिक मिळाले. एकूण सहभागी - बारा विद्यार्थी व एक अध्यापक.

सौर २२ आषाढ (दि. १३ जुलै) रोजी मा. प्राचार्यांनी अहिल्यादेवी शाळेत विज्ञान मंडळाच्या उद्‌घाटनानिमित्त ' निरीक्षण कौशल्य' या विषयावर इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थिनींना व्याख्यान दिले.

## विस्तार केंद्र, डोंबिवली

* विद्याव्रत जोपासना - जोपासनाच्या कार्यकर्त्यांच्या पहिल्या बैठकीत मुख्यत्वे मुलांशी मैत्री वाढवणे, त्यांचे विचार, मतं जाणून घेणे त्याप्रमाणे उपक्रम ठरवणे ही उद्दिष्टे ठरवली. जोपासनाचे उपक्रम १५ दिवसांनी एकदा किंवा महिन्यातून एकदा असावा असे ठरले. तसेच साधारण ऑगस्टमधे कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण शिबिर व्हावे असे ठरले.

बैठकीत ठरल्याप्रमाणे सौर २५ आषाढ (दि. १६ जुलै) रोजी मुलांना भातलावणीचा अनुभव देण्यासाठी जव्हार जवळच्या एका गावात नेले. डोंबिवलीची दहा मुले आणि पाच कार्यकर्ते व ठाण्याचे आठ विद्याव्रती आणि सात कार्यकर्ते गेलो होतो. दोन गट करून काही जण नाचणीची लावणी करायला तर काहीजण भाताची लावणी करायला गेलो. तिथल्या शेतकऱ्यांनी काम कसं करायचं ते दाखवलं. तिथल्या मुलांनी आपल्या मुलांना काही रानभाज्या, सागाची झाडं, भरपूर मोगऱ्याची झाडं (ही फुलं विक्रीसाठी पाठवली जातात) अशी माहिती दिली.

## सोलापूर केंद्र

**समाजदर्शन उपक्रम :** सौर ५ ते १३ आषाढ (दि. २६ जून ते दि. ४ जुलै) या कालावधीत प्रशालेत समाजदर्शन उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात इ. ५वी ते १०वीचे सर्व विद्यार्थी, माध्यमिक विभागातील सर्व अध्यापक, कर्मचारी, अर्थकार्यालयीन सदस्य, शि. अ. वि. च्या विद्यार्थीनी सहभागी झाल्या.

**विषय -** आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरच्या वारीसाठी सोलापुरातून जाणाऱ्या दिंड्यांचा परिचय.

१) इ. ५वी व ६वी - परिसरातील सहा विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशीनिमित्त होणाऱ्या भजनांमध्ये सहभाग घेतला.

२) इ. ७वी व ८वी - शेगावहून येणाऱ्या गजानन महाराजांच्या पालखीचा मुक्काम सोलापुरात २।। दिवस असतो. या दिंडीत विद्यार्थी सहभागी झाले.

**सहभागाचे स्वरूप -** दिंडीच्या स्वागतास जाणे, दिंडी समवेत चालणे, मुक्कामाच्या ठिकाणी चालून सेवा करणे, वारकऱ्यांच्या मुलाखती घेणे, दिंडीचे व्यवस्थापन जाणून घेणे.

३) इ. ९वी व १०वी साठी - फलटण, नातेपुते, अकलूज, माळशिरस, कंदर, अरण, पुरंदावडे, वेळापूर, वाखरी, पंढरपूर, धर्मापुरी, सदाशिव नगर या ठिकाणी जाऊन तेथे येणाऱ्या संतांच्या विविध दिंड्यामध्ये सहभागी होणे. विद्यार्थी सात संतांच्या दिंड्यामध्ये - ज्ञानेश्वर, तुकाराम, निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताई, एकनाथ, नामदेव या दिंड्यामध्ये व निर्मलवारीमध्ये सहभागी झाले.

**उपक्रमाच्या वातावरणनिर्मितीसाठी -**

१) अध्यापकांनी दिंडी संदर्भातील ताज्या बातम्या, वृत्तांत विद्यार्थ्यांना प्रार्थनेच्या वेळी सांगितल्या.

२) रेडिओवरून प्रसारित (नियमित) होणारा वारी संदर्भातील कार्यक्रम ऐकावा असे सुचविण्यात आले.

प्रत्यक्ष अनुभव घेऊन आल्यावर सौर १३ आषाढ (दि. ४ जुलै) रोजी इ. ८वी ते १०वीचे विद्यार्थी प्रशालेत झालेल्या सामूहिक भजन उपासनेत सहभागी झाले. प्रार्थनेच्या वेळी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या अनुभवांची निवेदने झाली तसेच मनोगत लेखन केले.

**विद्यार्थी यश -** मार्च २०१७ मध्ये झालेल्या इ. ५वी व ८वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला. इ. ५वी - सहभागी विद्यार्थी -३९, पात्र विद्यार्थी-२०, वरद संतोष बडवे यास शिष्यवृत्ती प्राप्त. इ. ८वी - सहभागी विद्यार्थी १८, पात्र विद्यार्थी -४.

एप्रिल २०१७ मध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य प्रज्ञा शोध परीक्षा (एमटीएस) परीक्षेत - इ. ८वीतील २५ विद्यार्थी सहभागी झाले. त्यापैकी १९ विद्यार्थी परीक्षा उत्तीर्ण झाले. उत्तेजनार्थ - मानसी जगताप, शरयू कोंडूभैरी.

इ. ९वी - २३ विद्यार्थी परीक्षेस बसले. २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तेजनार्थ - कौमुदिनी मंगरुळकर, श्रुती कदम. विशेष पारितोषिक - देवांगी गोडबोले. इ. १०वी - ३३ विद्यार्थी परीक्षेस बसले. १२ विद्यार्थी उत्तीर्ण. आशुतोष प्रदीप शिंदे - जिल्हास्तरीय सेकंड रँक - एम्. टी. एस्. शिष्यवृत्ती प्राप्त.

* * *

# ✻ सौर आषाढ १९३९ मधील उपक्रमांची छायाचित्रे ✻



'निनाद पुणे गुरूतत्त्व पुरस्कार',
आदर्श शिक्षक सन्मान, मा. यशवंतरावांना
श्री. सूर्यकांत पाठक यांच्या हस्ते



लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक
स्वीकारताना उदिता काळे व कुणाल कुरंदळे



नेतृत्व संवर्धन केन्द्र - मार्चमध्ये संपलेल्या वर्गातील
विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभ



रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे आयोजित
पाणी कवीसंमेलनात ज्ञान प्रबोधिनीचे
प्रतिनिधित्व करताना सुनिता गायकवाड



विद्याव्रत जोपासना वर्ग, डोंबिवली -
भातलावणी सहल



ज्ञान प्रबोधिनीच्या १९७८च्या तुकडीमधील
अर्थसाहाय्य केलेल्या गटाने वरोती खुर्द
येथील विहीर बांधकामाला दिलेली भेट



छात्र प्रबोधन -
कुमार साहित्य संपादकांचा मेळावा



स्पर्धा परीक्षा केन्द्र -
पालक मेळावा